# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. विशेष स्थायी समिती सभा दि. ०२/१२/२०१०

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक ०७/१२/२०१० रोजी सभा सुचना क्र. ११ दि. २४/११/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात दुपारी ०३.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. पिठासिन अधिकारी श्री. निर्मलकुमार देशमुख हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. दिनेश दगडू नलावडे | -- | सदस्य |
| २) | श्री. स्टिवन जॉन मेंन्डोंसा | -- | सदस्य |
| ३) | श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी | -- | सदस्य |
| ४) | श्री. चंद्रकांत म्हात्रे | -- | सदस्य |
| ५) | सौ. सुधा वासुदेव व्यास | -- | सदस्या |
| ६) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | -- | सदस्या |
| ७) | श्री. लक्ष्मण ग. जंगम | -- | सदस्य |
| ८) | सौ. कॅटलीन परेरा | -- | सदस्या |
| ९) | श्री. राजेश म्हात्रे | -- | सदस्य |
| १०) | श्री. मोहन जाधव | -- | सदस्य |
| ११) | श्रीम. मुसर्रतबानो शेख | -- | सदस्य |
| १२) | श्री. भगवती शर्मा | -- | सदस्य |
| १३) | श्री. रामनारायण दुबे | -- | सदस्य |
| १४) | श्रीम. स्नेहा शैलेश पांडे | -- | सदस्य |

### गैरहजर सदस्य

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. शशिकांत भोईर | -- | सदस्य |
| २) | श्री. मोहन गोपाळ म्हात्रे | -- | सदस्य |

**मा. पिठासिन अधिकरी :-**

नगरसचिवांनी सभेला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

दि. २६/११/२०१० रोजी मा. स्थायी समिती सभापती या पदासाठी नामनिर्देशनपत्र स्विकारण्याची वेळ होती. सदरच्या वेळेमध्ये श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा यांनी आपले नामनिर्देशन पत्र भरलेले आहे. ते मी मा. पिठासिन अधिकारी यांच्याकडे सुपूर्द करतो.

**पिठासिन अधिकारी :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. स्थायी समिती सभापती या पदासाठी श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा यांनी नामनिर्देशनपत्र भरलेले आहे. हे एकच नामनिर्देशनपत्र प्राप्त झालेले आहे आणि प्राप्त झालेले नामनिर्देशन पत्र हे आत्ता छाननी केल्यानंतर वैध आहे असे आढळून आले. मी निवडणुकीचा निकाल खालीलप्रमाणे जाहिर करत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका मा. स्थायी समिती सभापती पद हे एकच असल्याने व उमेदवार एकच असल्याने मतदान घेण्याची आवश्यकता नाही. सबब श्री. मेन्डोन्सा स्टिवन जॉन हे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदावर सन २०१०-११ या कालावधी करीता (निवडून आल्याच्या दिनांकापासुन १ वर्ष) बिनविरोध निवडून आल्याचे मी घोषीत करीत आहे.

**नगरसचिव :-**

मी नवनिर्वाचित मा. स्थायी समिती सभापती श्री. स्टिवन जॉन मेंन्डोंसा यांना डायसवर बोलावून मा. पिठासीन अधिकारी त्यांचा सत्कार करणार आहेत. तरी मी त्यांना विनंती करतो की, त्यांनी डायसवर यावे.

**मा. पिठासिन अधिकारी :-**

श्री. स्टिवन जॉन मेंन्डोंसा यांचे आपल्या सर्वांच्या वतीने अभिनंदन करतो. आपण कृपया डायसवर यावे.

**प्रकरण क्र. ७९ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २१ पोटकलम (१) अन्वये सन २०१०-११ या सालाकरिता मा. स्थायी समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची सभापती स्थायी समिती म्हणून नेमणुक करणेबाबत.

**ठराव क्र. ७१ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनिमय १९४९ मधील प्रकरण २ कलम २१ पोटकलम (१) अन्वये स्थायी समिती करिता ''सभापती'' पदावर नेमणुक करणेसाठी निश्चित केलेल्या तारखेस व वेळेत नामनिर्देशन पत्र मागविली असता (१) श्री. मेन्डोन्सा स्टिवन जॉन ह्यांनी आपले नामनिर्देशन पत्र दाखल केले. नामनिर्देशन पत्रांची छाननी केली असता नामनिर्देशन पत्र वैध ठरलेले आहे. ''सभापती'' पद हे एकच असल्याने व उमेदवार एक असल्याने मतदान घेण्याची आवश्यकता नाही. सबब श्री. मेन्डोन्सा स्टिवन जॉन हे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदावर सन २०१०-११ या कालावधी करीता (निवडून आल्याच्या दिनांकापासुन १ वर्ष) बिनविरोध निवडून आल्याचे मी घोषीत करीत आहे.

**सही/-**
**पिठासिन अधिकारी**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. पिठासिन अधिकारी :-**

निवडणुकीचा कार्यक्रम संपला असे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दु. ०३.२० वा.**

**सही/-**
**पिठासिन अधिकारी**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**